**पुढील सरतपास फिर्यादीतर्फे विधिज्ञ श्री. नितीन देव्हरकर यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

**११.** माझे शपथपत्रातील सर्व मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे.

**१२.** मला कंपनीमार्फत प्रकरण चालविणे संबंधात अथॉरिटी लेटर दिनांक १५/०५/२०१८ रोजी मिळाले त्या पत्राची मुळ प्रत मी प्रकरणात दाखल केली आहे. त्यास **निशाणी क्र. २७** देण्यात येते. मुळ टॅक्स इनव्हाईसची पावती क्र.१७/३१२९ दिनांक ०६/१२/२०१७ रोजीची दाखल असुन त्यावर कंपनीचा सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी २८** देण्यात येते. मुळ टॅक्स इनव्हाईसची पावती क्र.सीआरएल १७/१५१२ दिनांक ०६/१२/२०१७ रोजीची दाखल असुन त्यावर कंपनीचा सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी २९** देण्यात येते. त्यानंतर मुळ डिलेवरी चलन दिनांक ०६/१२/२०१७ रोजीचे दाखल असुन त्यावर रिसीव्हरची सही आहे व सदर आरोपीच्या नावाने दिलेली आहे. त्यावर कंपनीची सही आहे. त्यास **निशाणी ३०** देण्यात येते. आरोपीने आमच्यातील व्यवहारा संबंधी बँक ऑफ इंडिया शिवाजीनगर ब्रँच येथील धनादेश क्र.०८३४६६ रुपये २७,२६१/– चा करीता दिला होता. मला आता तो धनादेश दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही असुन आरोपीने आमच्या कंपनीच्या नावे दिला होता. त्यास **निशाणी क्र. ३१** देण्यात येते. मी तो धनादेश एस.बी.आय. शाखा पिंपरी येथे दिनांक ०६/०४/२०१८ रोजी वटविणे कामी लावला परंतु तो न वटता परत आला. पेमेंट स्टॉप्ड बॉय ड्रावर या संबंधीचा मेमो बँकेने दिनांक ०६/०४/२०१८ रोजी दिला. त्यावर बँकेचा अर्धवट शिक्का दिसुन येत आहे. सबब, त्यास **आर्टीकल अ** देण्यात येते. त्यानंतर मी आरोपीला दिनांक २६/०४/२०१८ रोजी माझे विधिज्ञांमार्फत नोटीस पाठविली होती. मला त्या नोटीसची प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझे विधिज्ञांची सही

आहे. त्यास **निशाणी क्र. ३२** देण्यात येते. सदरची नोटीस मी आरोपीला आर.पी.ए.डी.ने पाठविली होती. त्याबाबतची पावती मी प्रकरणात दाखल केली आहे. त्या पावतीस **निशाणी क्र. ३३** देण्यात येते. आरोपीने त्याच्या विधिज्ञांमार्फत त्या नोटीसला उत्तर दिले त्याची मुळ प्रत मी प्रकरणात दाखल केली त्यास **निशाणी क्र.३४** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Date: 2025.10.06 12:05:43 +0530

पिंपरी
दिनांक –२६/०९/२०२५

(एस.एस. चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग
पिंपरी, पुणे